कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२५-२६/१०३६
दि. ३१/०७/ २०२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

**कला अकादमीची बाल कलाकार राज्यस्तरीय भजन स्पर्धा दि.१२ ऑगस्ट रोजी**

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती बाल कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा मंगळवार दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.३० वाजल्यापासून कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर कलामंदिरात निश्चित करण्यात आली असून यात विभागीय स्पर्धेतील चार केंद्रावरुन निवडण्यात आलेली एकूण आठ पथके सहभागी होणार आहेत.

**त्यात श्री बाल गजानन बाल भजनी मंडळ, मंडूर-तिसवाडी, श्री शांतादुर्गा जांभळेश्वर सांस्कृतिक संस्था, कळंगुट-बार्देश, बाल भवन केंद्र, मडगांव, सर्वोदय एज्युकेशनल सोसायटिज हायस्कूल- ब, कुडचडे, सरकारी माध्यमिक विद्यालय, आमोणा-डिचोली, श्री शांतादुर्गा हायस्कूल बाल भजनी मंडळ, डिचोली, श्री कृष्ण नागझरकर बाल भजनी मंडळ, भोमा-फोंडा व श्री शांतादुर्गा बाल भजनी मंडळ, बांदोडा-फोंडा या पथकांचा समावेश आहे.**

राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणा-या आठही पथकानी आपल्या सर्व सहकलाकारासह पुर्वतयारीनिशी १२ ऑगस्ट २०२५ रोजी सादरीकरणाच्या किमान १ तास अगोदर कला अकादमी, पणजी येथे उपस्थित राहाणे आवश्यक आहे. सर्व पथकप्रमुखांच्या उपस्थितीत स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम चिठ्ठ्या टाकून ठरविला जाईल व तो सर्वावर बंधकारक राहील. त्यामुळे अंतिम स्पर्धेत सहभागी होणा-या आठही पथकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहाणे अनिवार्य आहे.

विभागीय व राज्यस्तरीय बाल कलाकार भजन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सायं. ५.३० वाजता होणार आहे. याची सर्व विजेत्या पथकांनी व कलाकारांनी नोंद घ्यावी.

सदर भजन स्पर्धा सर्वांसाठी खुली असून भजनप्रेमी रसिकांनी आपली उपस्थिती लावून स्पर्धेतील सादरीकरण करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)